# महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशन

*(संलग्नित : ए.आय.एफ.ई.ई. व ए.आय.टी.यू.सी.)* ☎ २५९२१९१ (का) ९८२३०१९५३१ (मो)

नोंदणी क्र. ४३०९

नेल्सन चौक, सिताराम महाराज मंदीराजवळ, छावणी, नागपूर - ४४००१३

E-mail : msewfnagpur@gmail.com

**मोहन शर्मा, अध्यक्ष**


**वृत्तपत्र निवेदन** नागपूर दि.१९/०६/२०२६

## महावितरण वीज कंपनीला शेअर मार्केटमधे लिस्टींग करण्यास वर्कर्स फेडरेशनचा विरोध

महाराष्ट्र शासनाच्या अधिकार क्षेत्रातील महावितरण वीज कंपनी ही राज्यातील ३ कोटी १७ लाख वीज ग्राहकांना आणि ४४ लाख शेतकऱ्यांना सवलतीच्या दरात अखंड वीज पुरवणारी देशांतील अग्रगणी वीज कंपनी आहे. या कंपनीने ३ लाख किलोमिटरची वीज यंत्रणा उभारुन ९९ टक्के प्रदेशाला वीज पुरवठा करण्याचे लक्ष्य गांठले आहे. या वीज कंपनीतील कर्मचारी अभियंते, अधिकारी यांनी जिवाचे रान करून ३ लाख कोटी रुपयाची मालंमत्ता उभी केलेली आहे. अश्या आशिया खंडात नावाजलेल्या या कंपनीचे खासगीकरण होउ नये म्हणून झालेल्या राज्यव्यापी संपावेळी मा.मुख्यमंत्री व उर्जामंत्री यांनी वीज कंपन्याचे कोणत्याही प्रकारचे खासगीकरण होणार नाही हे मान्य केले आहे.

### खासगीकरण शब्द प्रयोग टाळून खासगीकरणाचे नवीन मार्ग.

७ एप्रील २०२६ रोजी महाराष्ट्र सरकारने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे दोन विभागात विभाजन करण्यास मान्यता दिली. पहिली कंपनी औद्योगिक, व्यवसायिक, निवासी आणि इतर वीज ग्राहक यांचेकरीता आणि दुसरी एम एस ई बी सोलर ॲग्रो पॉवर लिमी. ही स्वतंत्र कंपनी पुर्णत: शेती ग्राहकांसाठी. या निर्णयामुळे स्वतंत्र कृषी कंपनीतील ४४ लाख शेतकरी कृषी पंपधारकांकडे असलेल्या थकबाकीची जबाबदारी सरकार घेणार आहे. परिणामी वितरण कंपनीवर असलेला थकबाकीचा भार कमी होउन आर्थीक स्थिती बळकट होण्यास मदत होईल.

कृषी कंपनी निर्माण करण्यास शासनाचा हेतू योग्य आहे असे गृहीत धरले तरी त्यानंतर महावितरण कंपनीला शेअर मार्केटमधे लिस्टिंग करण्यामागे शासन व व्यवस्थापणाचा हेतू छुप्या मार्गाने खासगीकरणाकडे घेउन जाण्याचा आहे. आय पी ओ हे दुसरे तिसरे कांही नसून सार्वजानिक क्षेत्रातील सरकारी महावितरण कंपनीतील मालकी कमी करण्याचे व त्यामाध्यमाने खासगीकरणाच्या दिशेने टाकलेले पाऊल आहे. म्हणून वर्कर्स फेडरेशनचा आय पी ओ ला तिव्र विरोध आहे.

### आय पी ओ चे संभाव्य धोके

आय पी ओ नंतर महावितरण कंपनीचे शेअर्स बाजारात सुचीबध्द हाउेन खरेदी विक्रीसाठी उपलब्ध होतील. सुरवातीला शासनाने व व्यवस्थापणाने खासगी क्षेत्रातील सुचीबध्द होणाऱ्या शेअर्सची संख्या टक्केवारीत कमी दाखवली असली तरी हे प्रमाण हळूहळू भांडवलदार कंपन्या महावितरणमधील आपली मालकी वाढवतील. महाविरतण कंपणीचा आय पी ओ म्हणजे सरकारी मालकी कमी करण्याचे एक साधन असून खासगकीरणाकडे घेउन जाण्याचा मार्ग आहे. आय पी ओ नंतर महावितरणमधील सरकारी हिस्सा कमी करण्यास **'फॉलो ऑन पब्लिक'** ऑफरिंग्ज (FPOS) आणल्या जांतील. अशाच प्रकारे गेल्या कांही वर्षात FPOS च्या माध्यमातून अनेक सार्वजानिक उपक्रमांतील सरकारी मालकी ५५ ते ६० टक्यापर्यंत खाली आणली गेली आहे ही वास्तविकता नजर अंदाज करता येणार नाही. आय पी ओ मुळे महावितरणमधील सामाजिक अकांऊटॅबिटी संपून प्राफिटीबिलीटी (नफेखोर) अकाऊंटींगची ही सुरवात ठरणार आहे.

### महावितरणमधील कर्मचाऱ्यांना आमिष दाखवले जाईल

महावितरणचे कर्मचारी अभियंते व अधिकाऱ्यांनी आय पी ओला विरोध करू नये म्हणून शासन व व्यवस्थापणाद्वारे १०-१५ टक्के शेअर्स देण्याचे प्रलोभनही देण्यात येण्याची शकयता आहे. मात्र आय पी ओच्या धोरणाने स्टेट बॅंक ऑफ इंडिया, एन डी टी व्ही, जिनस कंपनी आणि एल आय सी वर झालेले परिणाम समोर आहेत. आय पी ओ व्दारा शेअर्सचे लिंकेज सरकार करीता ५१ टक्के च्या वर राहील त्यामुळे त्यानंतरही कंपनीवरील नियंत्रण सरकारकडेच राहील हा

प्रथमदर्शनी सरकार व व्यवस्थापणाचा युक्तीवाद राहील. मात्र आपल्याला हे विसरता येणार नाही की केन्द्रिय वित्त मंत्रालयाच्या मुख्य आर्थीक सल्लागारांनी सार्वजानिक क्षेत्रातील उपक्रमामधील किमान सरकारी हिस्सेदारीची मर्यादा २६ टक्के पर्यंत खालील आणण्याचे निर्देश दिले आहेत. राज्य सरकार आणि आपले व्यवस्थापण यांनी ते पाळले तर भांडवलदार कंपन्यांचे नियंत्रण आपोआप येणार आहे.

फक्त आय पी ओ नव्हे तर विविध मार्गाने महावितरण कंपनीचे अफाट क्षेत्र भांडवलदार व त्याच्या कंपन्यांच्या अधिकार क्षेत्रात झोकून खासगीकरण करण्याची प्रक्रिया आहे. वीज उद्योगाच्या खासगीकरणासाठी विवीध मार्गांचा अवलंब केला जात आहे, फ्रॅन्चाईसीकरण, महावितरण कंपनीशी स्पर्धा करण्यासाठी खासगी कंपन्या आणणे, स्मार्ट बिलींगच्या माध्यमाने मिटर रिडींग, वसुलीचे काम संपृष्ठात आणणे सध्या महाराष्ट्रात सुरु आहे . महावितरणच्या कांही सर्कल मधे फ्रॅन्चाईसी कंपन्या आणण्याचे प्रयत्न जोरदार सुरू आहेत. म्हणून या धोरणांचा व उपायाचा विरोध करण्यास कामगार, कर्मचारी, अभियंते व अधिकाऱ्यांना एकजुटीने आपली कंपनी वाचवण्याकरीता व आपल्या अस्तित्वाकरीता संघटित झाले पाहिजे.

सार्वजानिक क्षेत्रातील उपक्रम असलेल्या आय डी बी आय बॅंकेच्या बाबतील सरकारने सुरवातीला IPO आणि FPO च्या माध्यमातून सरकारी मालकी साततयाने कमी केली व नंतर या बॅकेत LIC ला मोठा भागधारक बनवून सरकारने आपली हिस्सेदारी ५१ टक्के पेक्षा खालील आणली परिणामी IDBI बॅंक ही सार्वजानिक क्षेत्रातील बॅंक राहिलेली नाही आणि तिचे खासगीकरण केले जाऊ शकते. महावितरणची अवस्था देखील अगदी अशीच होउ शकते.

**<u>कोटयावधी रूपयाची मालमत्ता असलेल्या महावितरणची किंमत १४००० कोटी कशी?</u>**

४७८ कोटी रूपयाच्या नफ्यात असलेलया महावितरण कंपनीश्ची आय पी ओ करीता एकूण किंमत केळ १४००० कोटी रु. लावण्यात आली आहे. भांडवलदाराच्या फायद्याकरीता ही कमी किंमत लावण्यात आली जेणेकरून अदाणी सारख्या कंपन्यांचे ते हिताचे होईल. याला वर्कर्स फेडरेशनचा विरोध आहे.

वीज क्षेत्राचा खासगीकरणाव्दारे संपुर्ण ताबा मिळवण्याचा हा अदाणी, अंबाणी, रिलायंस, गायेका, जिंदाल टोरंट (मेहता ग्रुप) यासारख्या देशातील सर्वात मोठया भांडवलदारांचा अजेंडा आहे. या मक्तेदार घराण्यांचे देशातील औष्णिक वीज निर्मितीवर आधीच वर्चस्व आहे आणि अक्षय उर्जा मिर्मितीवर तर त्यांची पुर्ण मोलाची मालकी आहे. आता त्यांना महावितरण, महापारेषण या क्षेत्रावरही नियंत्रण मिळवायचे आहे. आय पी ओचे हे धोरण त्या अजेंडयाच्या दिशेने उचललेले एक आक्रमक पाऊल आहे.

**<u>शासनाने स्टेकहोल्डर कामगार संघटनांना विश्वासात घेतले नाही.</u>**

त्यामुळे शेअर मार्केटमधे लिस्टींग करण्याबाबत कामगार संघटनाच्या मनांत अनेक प्रश्न आहे. प्रस्तावित प्रारंभिक सहभाग विक्रीसाठी (IPO) बुक रनिंग लीड मॅनेजर्स (मर्चन्ट बॅकर्स) यांच्या निवडीसाठी प्रस्ताव व मागणी निविदा दि.२७ मे २०२६ रोजी काढली असून या निविदा बाबत कुठल्याही वर्तमानपत्रात जाहिरात देण्यांत आलेली नाही. त्यामुळे ही निविदा संशयाच्या भोवऱ्यात आहे.

मा. मुख्यमंत्री व उर्जामंत्री यांनी कामगार संघटना समवेत संयुक्त बैठक आयोजित करून या अत्यंत संवेदनशिल धोरणावर चर्चा घडवून आणण्याची विनंती संघटनेने केली आहे.

आपले विश्वासू

मोहन शर्मा
अध्यक्ष

कृष्णा भोयर
सरचिटणीस

प्रती संपादक......................कृपया वरील बातमी प्रसिध्द करून सहकार्य करावे.